पुण्यनगरी

# जाधव महाविद्यालयात एम.कॉम. सुरु

कोपार्डे : प्रतिनिधी

आनंदी शिक्षण प्रसारक मंडळ, कळंबे तर्फ कळेच्या गगनबावडा येथील पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव महाविद्यालयास महाराष्ट्र राज्य शासनाकडून व शिवाजी विद्यापीठाकडून शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून नियमित एम. कॉम. (ॲडव्हान्सड अकौंटन्सी) या अभ्यासक्रमास नुकतीच मान्यता मिळाली आहे. यामुळे गगनबावड्यासारख्या दुर्गम व डोंगराळ भागातील विद्यार्थ्यांना पदव्युत्तर अभ्यासक्रमाची सुविधा आनंदी शिक्षण संस्थेमार्फत उपलब्ध करून दिल्याबद्दल संस्थाध्यक्ष प्रा. सतीश देसाई, सचिव डॉ. विद्या देसाई व प्राचार्य डॉ. एन. व्ही. शहा यांचे विद्यार्थ्यांकडून व पालकांकडून अभिनंदन होत आहे. शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता एम.कॉम. तसेच बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., एम.ए.चे प्रवेश सुरू असल्याची माहिती डॉ. एस. एस. पानारी, प्रा. ए. एस. कांबळे यांनी दिली.

लोकमत

# बीपीएडसह १६ परीक्षांचे निकाल जाहीर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** एम. एस्सी., बी. पी. एड., एम. ए. अशा विविध १६ अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे निकाल शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने गुरूवारी ऑनलाईन जाहीर केले.

निकालामध्ये एम. एस्सी. (झूलॉजी सत्र एक, दोन), फिजिक्स (सत्र एक, दोन), बॉटनी (सत्र एक, दोन), एम. ए., एम. एस्सी. (भूगोल सत्र एक, दोन), बी. पी. एड. (सत्र तीन आणि चार), एम. एस्सी. (होरिझोनटंल मोबीलिटी बायो-केमिस्ट्री सत्र एक, दोन), बायो-टेक्नॉलॉजी सत्र एक, दोन), ॲग्रो-केमिकल ॲण्ड पेस्ट मॅनेजमेंट सत्र एक, दोन) या परीक्षांचा समावेश आहे. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील तीन केंद्रांवर गुरूवारी १,१३२ विद्यार्थ्यांनी एम. फिल., पीएच. डी. प्रवेश परीक्षा दिली. त्यासाठी एकूण १,८३२ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. अकौंटन्सी, व्यावसायिक अर्थशास्त्र, वाणिज्य, फिजिक्स, गृहशास्त्र, केमिकल इंजिनिअरिंग, इंग्रजी, लॉ, हिंदी, टेक्सटाईल इंजिनिअरिंग, बॉटनी, राज्यशास्त्र या विषयांतील एम. फिल, पीएच. डी. अभ्यासक्रमासाठी परीक्षा झाली.

पुढारी

# परीक्षा शुल्कवाढीस एक वर्षासाठी स्थगिती

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ अधिकार मंडळाच्या ठरावानुसार कोरोनामुळे निर्माण झालेल्या बिकट आर्थिक परिस्थितीमुळे विद्यार्थी शुल्क भरू शकत नसल्याने शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील परीक्षा शुल्कवाढीस एक वर्षासाठी स्थगिती देण्यात आली आहे. नुकताच विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद बैठकीत निर्णय झाला आहे.

2 9 OCT 2021

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विविध ऑनलाईन शैक्षणिक सुविधांचा लाभ घ्यावा

## बॅ.खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालिका डॉ.नमिता खोत यांचे आवाहन ; कुलगुरुंच्या हस्ते ऑनलाईन उपक्रमाचे लोकार्पण

प्रतिनिधी
कोल्हापूर

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (युजीसी) 'कन्सॉर्शियम ऑफ एज्युकेशनल कम्युनिकेशन' (सीईसी) उपक्रमांतर्गत विविध ऑनलाईन शैक्षणिक सुविधा शिवाजी विद्यापीठाच्या पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांसाठीही उपलब्ध आहेत. त्यांचा लाभ घ्यावा, असे आवाहन बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालिका डॉ. नमिता खोत यांनी केले आहे.



कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते या उपक्रमाचे नुकतेच ऑनलाईन लोकार्पण झाले. 'सीईसी'ने तयार केलेल्या पदवी स्तरावरील अभ्यासक्रमांसाठीचे स्टडी मटेरियल तसेच ई-कन्टेन्टचा विद्यार्थ्यांना लाभ व्हावा, यासाठी विद्यापीठाने त्यांच्यासमवेत सामंजस्य करार केला. या करारांतर्गत स्टडी मटेरियल पदवी स्तरावर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना उपलब्ध आहे. बॅ. खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या e-contents for Under Graduate Students या वेबपेजवर 'सीईसी'च्या http://cen.in/cec/curriculum_class या लिंकवरील ई-कन्टेन्ट व्हिडिओसह उपलब्ध केले आहेत.

या लिंकमधील मॉड्यूलमध्ये चार विभाग (क्वाड्रंट) आहेत. त्यापैकी पहिल्या विभागात लिखीत (टेक्स्ट) स्वरुपातील संसाधने आहेत. दुसऱ्या विभागात ऑडिओ-व्हिज्युअल स्वरुपातील व्याख्याने (लेक्चर) उपलब्ध आहेत. तिसऱ्या विभागात संदर्भसाधने तर चौथ्या विभागात स्वयंमूल्यांकनासाठी प्रश्नावली व स्वाध्याय समाविष्ट आहेत. विज्ञान व तंत्रज्ञान, व्यवस्थापन व व्यावसायिक, सामाजिकशास्त्रे आणि कला व संस्कृती या चार मुख्य विषयांमधील ६६ उपविषयांच्या ७४० पेपरची व्याख्याने यांतर्गत उपलब्ध आहेत.

### विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त, प्रभावी साधने : कुलगुरू डॉ. शिर्के

'युजीसी'चा 'सीईसी' उपक्रम विद्यार्थीभिमुख असून देशातील विद्यार्थ्यांसाठी तो अतिशय उपयुक्त सिद्ध झाला आहे. म्हणूनच विद्यापीठाने त्यांच्याशी सामंजस्य करार करून त्यांच्याकडील अभ्यासाची संसाधने पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांनाही उपलब्ध करून देण्याचे ठरवले. 'सीईसी'च्या व्यासपीठावरील अत्यंत उपयुक्त व प्रभावी स्टडी मटेरियल विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देताना आनंद होत आहे. या सुविधेचा सर्वच विद्यार्थी निश्चितपणे लाभ घेतील, असा विश्वास कुलगुरू डॉ. शिर्के यांनी व्यक्त केला.

2 9 OCT 2021

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दर्जेदार लेखनामुळे वाचकांची दिवाळी समृद्ध होईल

## प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांचे प्रतिपादन : 'तरुण भारत' दिवाळी अंकाचे प्रकाशन

प्रतिनिधी
कोल्हापूर

दिवाळी अंकाच्या माध्यमातून 'तरुण भारत'ने वाचकांची अभिरूची वाढविण्याचे काम केले आहे. विविध विषयांना स्पर्श करणाऱ्या दै. तरुण भारतच्या यंदाच्या दर्जेदार दिवाळी अंकामुळे वाचकांची दिवाळी समृद्ध होईल, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी केले.

'तरुण भारत'च्या दिवाळी अंकाचे प्रकाशन गुरूवारी येथील दसरा चौकातील कार्यालयात प्र–कुलगुरू डॉ. पाटील यांच्या हस्ते आणि 'तरुण भारत' परिवारातील सदस्यांच्या उपस्थितीत झाले.

प्र–कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, 'तरुण भारत'ने दैनिकाच्या माध्यमातून परखड आणि निर्भीड भूमिका घेत लौकिक संपादन केला आहे. सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्रातील विविध विषयांची बाजू मांडत दिवाळी अंकाच्या परंपरेतही 'तरुण भारत'ने आपले स्वतंत्र असे स्थान निर्माण केले आहे. आजच्या ऑनलाईन, डीजिटलच्या काळात सकस लेख असणारा परिपूर्ण दिवाळी अंक वाचकांना दिला आहे. असा सर्वांगसुंदर दिवाळी अंक निश्चितपणे वाचकांच्या पसंदीस उतरेल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.



कोल्हापूर : 'तरुण भारत'च्या २०२१ च्या दिवाळी अंकाचे प्रकाशन गुरूवारी शिवाजी विद्यापीठाचे प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी छायाचित्रात डावीकडून प्रशासन अधिकारी राहुल शिंदे, जाहिरात मांडणी विभाग प्रमुख विजय शिंदे, मुख्य उपसंपादक यशवंत लांडगे, मुख्य प्रतिनिधी संजीव खाडे, निवासी संपादक मनोज साळुंखे, जाहिरात व्यवस्थापक (शहर) मंगेश जाधव, वरिष्ठ प्रतिनिधी सुधाकर काशीद, वितरण विभागप्रमुख सचिन बरगे, प्रॉडक्शन इन्चार्ज राजू नंदगडकर, डी. टी. पी. विभागप्रमुख महादेव पाटील. (छाया: इम्रान गवंडी)

'तरुण भारत'चे निवासी संपादक मनोज साळुंखे यांनी 'तरुण भारत'च्या शतक महोत्सवी वाटचालीची माहिती दिली. ते म्हणाले, तरुण भारत'ने विविध प्रश्नांना वाचा फोडून फार मोठी भूमिका बजावली आहे. वाचकांच्या पाठबळावर शंभर वर्षाहून अधिक काळ लोकांच्या मनात वेगळा ठसा उमटवला आहे. दैनिकाबरोबर दरवर्षी वैशिष्ट्यपूर्ण दिवाळी अंकही वाचकांना देण्याची परंपरा जपली आहे. दिवाळी अंकाच्या माध्यमातून नवोदित, युवा लेखक, कवी यांना संधी दिली. त्यातून असंख्य लेखक, कवी घडवले, असेही साळुंखे यांनी सांगितले.

स्वागत, प्रास्ताविक मुख्य प्रतिनिधी संजीव खाडे यांनी केले. यावेळी तरुण भारतचे सर्व विभागप्रमुख व इतर सदस्य उपस्थित होते.

तरुण भारत

# विद्यापीठ परीक्षा शुल्क वाढीस स्थगिती

**कोल्हापूर :** शैक्षणिक वर्ष २०२१–२२मधील परीक्षा शुल्क वाढीस स्थगिती देण्यात आली आहे. विद्यापीठ अधिकार मंडळाच्या ठरावानुसार घेण्यात आला आहे, अशी माहिती शिवाजी विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने प्रसिध्द करण्यात आली आहे. कोरोनाच्या कालावधीत अनेक कुटुंबांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागला आहे. सध्याही पाहिजे तशी आर्थिक परिस्थिती सुधारली नसल्याने बहुतांश विद्यार्थी प्रवेश शुल्क भरू शकत नाहीत. त्यामुळे गतवर्षी परीक्षा शुल्क वाढीला स्थगिती दिल्याने विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे.